**ठळक बातम्या**

- राष्ट्रीय पंचायत पुरस्कार २०२४चं आज नवी दिल्लीत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते  वितरण
- सातव्या स्मार्ट इंडिया हॅकेथॉनच्या अंतिम फेरीला आज देशभरातल्या ५१ केंद्रांवर सुरुवात, प्रधानमंत्री विद्यार्थ्यांशी साधणार संवाद
- सत्ताधारी आणि विरोधक यांनी उपस्थित केलेल्या विविध मुद्द्यांवर गदारोळ झाल्यानं राज्यसभेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब
- **आणि**
- संयुक्त राष्ट्रांच्या पर्यावरण संस्थेचा चॅम्पियन ऑफ अर्थ जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ माधव गाडगीळ यांना जाहीर

**<><><><><>**

राष्ट्रीय पंचायत पुरस्कार २०२४चं वितरण राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज नवी दिल्लीतील विज्ञान भवन इथं होणार आहे. या वर्षी, विविध श्रेणींमध्ये एकंदर ४५ पुरस्कार विजेत्यांची निवड करण्यात आली आहे, ग्रामीण भागात तळागाळात प्रशासन आणि विकासासाठी काम करणाऱ्या पंचायतींना हे पुरस्कार दिले जातात. पंचायती राज मंत्री पुरस्कारप्राप्त पंचायतींच्या नाविन्यपूर्ण आणि परिणामकारक पद्धतींची माहिती देणाऱ्या पुस्तिकेचं अनावरण करतील. या पुरस्कारांद्वारे इतर पंचायतींनी सर्वोत्तम पद्धतींचा अवलंब करुन ग्रामीण भारताच्या सर्वांगीण विकासात योगदान द्यावं असा उद्देश असल्याचं मंत्रालयानं दिलेल्या एका निवेदनात म्हटलं आहे.

**<><><><><>**

सातव्या स्मार्ट इंडिया हॅकेथॉनची अंतिम फेरी आज देशभरातल्या ५१ केंद्रांवर सुरु झाली. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी दूरस्थ माध्यमातून याचं उदघाटन केलं. देशातले विद्यार्थी हेच विकसित भारताचे चालक असल्याचं प्रधान यांनी यावेळी सांगितलं. युवावर्गाची बुद्धिमत्ता, व्हिजन, मेहनत, उत्साह, नेतृत्वगुण आणि नवोन्मेष यामुळे २१ व्या शतकातली ज्ञानाधारित अर्थव्यवस्था म्हणून भारताचा उदय होईल आणि अनेक विकसनशील देशांसाठी ते आदर्श विकास प्रारूप ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या प्रेरणेनं सुरु झालेल्या स्मार्ट इंडिया हॅकेथॉन या स्पर्धेत नवोन्मेष आणि सर्जनशीलता या गुणांचा कस लागतो. सलग ३६ तास चालणाऱ्या अंतिम फेरीत विविध मंत्रालयं, विभाग, उद्योग समूह यांच्या समस्यांवर विद्यार्थ्यांचे चमू सॉफ्टवेअर सोल्युशन्स शोधत आहेत. यंदाच्या हॅकेथॉनमध्ये संस्था स्तरावर दीडशे टक्के वाढ नोंदवली गेली आहे.

आज होत असलेल्या अंतिम फेरीत महाराष्ट्रातल्या मुंबई, पालघर, बुलडाणा, नांदेड, कोल्हापूर, नाशिक धुळे, पुणे, नागपूर, वर्धा, सोलापूर, ठाणे, सांगली आणि छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांमधल्या सुमारे तेराशे विद्यार्थ्यांचा समावेश आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज दुपारी साडेचार वाजता या विद्यार्थ्यांशी संवाद साधणार असून त्यांना मार्गदर्शन करणार आहेत.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज देशवासियांना गीताजयंतीच्या शुभेच्छा दिल्या. भारतीय संस्कृती, अध्यात्म आणि परंपरा यांना मार्गदर्शन करणाऱ्या शास्त्राचा निर्मिती दिवस म्हणून आजचा पवित्र दिवस साजरा केला जातो, असं प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमावरल्या  पोस्टमध्ये  म्हटलं आहे. यावेळी प्रधानमंत्र्यांनी भगवान कृष्णाचं स्मरण  केलं आणि भगवद गीता सर्वांना कर्मयोगाचा मार्ग दाखवेल अशी आशा व्यक्त केली.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांनी आज माजी राष्ट्रपती प्रणब मुखर्जी यांना त्यांच्या जयंती निमित्त आदरांजली वाहिली. भारताच्या विकासकार्यात प्रणब मुखर्जी याचं भरीव योगदान राहिलं आहे, प्रशासन आणि भारतीय संस्कृतीची खोल समज यामुळे सर्वच बाबतीत ते  सर्वसहमती निर्माण करू शकत, अशा शब्दात त्यांनी माजी राष्ट्रपतींचं  वर्णन केलं आहे.

**<><><><><>**

जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी सरकार आणि  उद्योगांनी जगभरात एकत्र येऊन काम करण्याची गरज आहे, असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज सांगितलं. नवी दिल्लीत भारतीय उद्योग संघाद्वारे आयोजित जागतिक आर्थिक धोरण मंचाच्या मेळाव्यात 'जागतिक अर्थव्यवस्थे◌साठी दशकभराची प्राथमिकता' या विषयावर त्या बोलत होत्या. जागतिक पातळीवरची परिस्थिती सामान्य करणं ही आजची प्राथमिकता आहे, असं सीतारामन म्हणाल्या. महागाई हे जगासमोरचं मोठं

आव्हान असून देशादेशातील संघर्ष यामागचं कारण आहे, असंही त्यांनी सांगितलं.

<><><><><>

देशभरातील विद्यापीठांत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना जगभरातील प्रकाशकांनी प्रकाशित केलेलं साहित्य एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने एक देश एक सदस्यता योजनेची सुरुवात येत्या १ जानेवारीपासून होणार आहे. केंद्र सरकारचे प्रमुख वैज्ञानिक सल्लागार ए के सूद यांनी काल आकाशवाणीला ही माहिती दिली. ३० अग्रगण्य संशोधन प्रकाशक संस्थांकडचं साहित्य उपलब्ध होणार आहे. या योजनेच्या पहिल्या टप्प्यामुळे एकंदर ६ हजार ३०० सरकारी शिक्षण संस्थांमध्ये शिकणाऱ्या १ कोटी ७७ लाखांहून अधिक विद्यार्थांना फायदा होईल. तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, गणित, वैद्यकीय, व्यवस्थापन, समाजशास्त्र आणि मानवता आदी विषयांवरील प्रबंध अभ्यासासाठी उपलब्ध होतील.

<><><><><>

संसदेच्या हिवाळी अधिवेशनादरम्यान आजही राज्यसभेत सत्ताधारी आणि विरोधक यांनी उपस्थित केलेल्या विविध मुद्द्यांवर गदारोळ होऊन सभागृहाचं कामकाज आधी बारा वाजेपर्यंत आणि त्यानंतर दिवसभरासाठी तहकूब झालं. अध्यक्ष जगदीप धनखड यांनी त्यांच्यावरचा अविश्वास ठराव फेटाळून लावला. काँग्रेसनं अध्यक्षपदाचा अनादर केला असून त्यासाठी त्यांनी माफी मागावी, अशी मागणी संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी केली. जे पी नड्डा यांनी सोनिया गांधी आणि जॉर्ज सोरोस

यांच्यातल्या संबंधांचा मुद्दा मांडत यावर चर्चा घेण्याची मागणी केली. हा देशाच्या अंतर्गत सुरक्षेचा मुद्दा असल्याचं ते म्हणाले.

लोकसभेतही आज सत्ताधारी पक्षानं या मुद्द्यावरून काँग्रेसवर टीकेची झोड उठवली. परदेशी शक्तींशी हातमिळवणी करून भारताची अर्थव्यवस्था कमकुवत करण्याचा काँग्रेसचा डाव आहे, असा आरोप केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी केला. त्यावर गदारोळ होऊन कामकाज दोन वाजेपर्यंत तहकूब झालं.

**<><><><><>**

केंद्र सरकार आर्टिफिशिअल इंटेलिजन्स अर्थात कृत्रिम बुद्धिमत्तेवर नियंत्रण आणणारा कायदा करण्याच्या विचाराधीन असून, यावर सभागृहाचं एकमत अपेक्षित असल्याचं केंद्रीय माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज लोकसभेत सांगितलं. देशात एक व्यापक भारत एआय मिशन सुरू करण्यात आलं असून, त्यात एआय कंप्युट सुविधा निर्माण करणं, कौशल्य फ्रेमवर्क, स्टार्ट-अप्ससाठी वित्तपुरवठा, इनोव्हेशन सेंटर, डेटासेट प्लॅटफॉर्म तयार करणं आणि नवीन ॲप्लिकेशन तयार करणं हे सात स्तंभ असल्याचं ते म्हणाले. यासंदर्भात अन्य एका प्रश्नावर उत्तर देताना वैष्णव यांनी, छत्रपती संभाजीनगर इथं कृत्रिम ॲप्लिकेशचं काम सुरु करण्यात येणार असल्याची माहिती दिली. सांगलीचे खासदार विशाल पाटील यांनी यासंदर्भातला प्रश्न उपस्थित केला होता. यामुळे सेमी कंडक्टर उद्योगासह शेती उत्पादनाला देखील चालना मिळणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ माधव गाडगीळ यांना संयुक्त राष्ट्रांची पर्यावरण संस्था असलेल्या UNEP चा चॅम्पियन ऑफ अर्थ जीवनगौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. पर्यावरणाचं संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी काम करणाऱ्यांना तसंच, जागतिक हवामान बदल, दुष्काळ आणि जमिनीचा खालावत चाललेला दर्जा याविरोधात काम करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कारानं सन्मानित करण्यात येतं.

**<><><><><>**

मुंबईतील कुर्ला बस अपघाताची चौकशी करण्यासाठी बृहन्मुंबई इलेक्ट्रिक वाहतूक परिवहन मंडळानं चार सदस्यीय समितीची स्थापना केली आहे. चालकानं सुरक्षा नियमांच पालन केलं होतं की नाही किंवा बसमध्ये काही तांत्रिक बिघाड होता यासंदर्भातील चौकशी ही समिती करेल. सोमवारी झालेल्या या अपघातात ४२ जण जखमी झाले आणि ७ जणांचा मृत्यू झाला आहे.

**<><><><><>**

भारतीय रिझर्व्ह बँकेचे २६वे गव्हर्नर म्हणून संजय मल्होत्रा यांनी आज पदभार स्वीकारला. संजय मल्होत्रा हे भारतीय प्रशासकीय सेवेतले राजस्थान केडरचे १९९० सालचे अधिकारी असून, ते अर्थमंत्रालयात महसूल सचिव पदावर कार्यरत होते.

**<><><><><>**

महिला क्रिकेटमध्ये, पन्नास षटकांच्या तीन सामन्यांच्या मालिकेतील तिसरा आणि अंतिम सामना आज भारत आणि यजमान ऑस्ट्रेलिया संघादरम्यान सुरू आहे. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय

घेतला. ऑस्ट्रेलियानं ५८ धावांवर सलामीविर जॉर्जिया ओलच्या रुपात आपला पहिला गडी गमावला. त्यानंतर फोबी लिचफिल्ड आणि एलिस पेरी या एकामागोमाग बाद झाल्या. भारताच्या अरुंधती रेड्डीनं चार तर दीप्ती शर्मानं एक गडी बाद केला.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा ऑस्ट्रेलियाच्या ४९ षटकांत ५ बाद २७५ धावा झाल्या होत्या.

//<><><><><>//